MMRC

# कुलाबा-वांद्रे-सीप्झ मुंबई मेट्रो-३ मार्ग

## बॅटरी-चलित शन्टरने पहिल्या ८ डब्यांच्या मेट्रो मार्ग-३ ट्रेनची यशस्वीपणे जुळवणी केली

मुंबई, ८ ऑगस्ट, २०२२ - कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो मार्ग-३ साठी ८ डब्यांची पहिली प्रोटोटाईप ट्रेन बॅटरी-चलित शन्टरने यशस्वीपणे जोडली आहे. मुं.मे.रे.कॉ. च्या कार डेपोसाठी केलेली ही पहिली खरेदी.

या शन्टरने मुं.मे.रे.कॉ. द्वारे सारीपूत नगर, आरे, येथे "ट्रेन डिलिव्हरी आणि चाचणी ट्रेकसाठी उभारलेल्या तात्पुरत्या सुविधेमध्ये पहिल्या ८ डब्यांच्या ट्रेनची जुळवणी केली.

या छोट्या अद्भूत शन्टरची क्षमता ३५० टन वजन खेचण्याची आहे. बॅटरी पूर्णपणे चार्ज असताना हे शन्टर ८ डब्यांची ट्रेन ९ कि.मी.पर्यंत खेचू शकते. तसेच हे शन्टर सतत ५० किलो न्यूटन क्षमतेने काम करू शकते.

या शन्टरची त्याच्या स्वयंचलित कप्लर तसेच अर्धस्थायी कप्लर अडॉप्टरसह यशस्वीरीत्या चाचणी करण्यात आली. दोन्ही कप्लर मेट्रो डबे जोडण्यासाठी वापरले जातात.

ठाणे येथील मे. रेनमॅक इंडिया प्रा.लि. यांनी नेदरलँड्सच्या एन.आय.टी.इ.क्यू. संस्थेसोबतच्या संयुक्त उपक्रम आणि तंत्रज्ञान हस्तांतरण करारांतर्गत मेक-इन-इंडियाच्या धोरणाचा एक भाग म्हणून या रेल कम रोड शन्टरची पूर्णपणे निर्मिती केली आहे. (समाप्त)

**For further information please contact :-**


Niti Tamse

8369727364/9664215544

niti.tamse@mmrcl.com

Afreen Shaikh

8655533926

afreen.shaikh@mmrcl.com

MMRC